राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र.CIC/अ.क्र.६६४७/२०२६

श्री. रियाज सय्यद शेख
रा. 51/1/12, उत्तर सदर बझार,
जवाहर नगर, सोलापूर-413003.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक
इलाखा शहर विभाग, (सा.बां.वि.) यांचे कार्यालय 2 रा मजला,
बांधकाम भवन इमारत, 25 मर्झबान रोड, मुंबई-400 001.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, (सा.बां.वि.) यांचे कार्यालय 2 रा मजला,
बांधकाम भवन इमारत, 25 मर्झबान रोड, मुंबई-400 001.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.०८.२०२६

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
०१.०९.२०२२	२०.१२.२०२२	०९.१०.२०२२	१४.१२.२०२२

अपिलार्थीनी दाखल केलेल्या जोडपत्राच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता नाईक यांच्याकडून आमदार निवास सब डिव्हिजन, सेंट्रल सब डिव्हिजन, साउथ सब डिव्हिजन, वेस्ट साऊथ डिव्हिजन, दिल्ली महाराष्ट्र सदन, सब डिव्हिजन या सब डिव्हिजनला जानेवारी २०२२ ते ऑगस्ट २०२२ या महिन्यांमध्ये किती बिले व किती काम वाटप केले तसेच किती बिले काढली व पेंडिंग बिले किती आहेत याबाबत माहिती मागितली असून तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी दिनांक १३.०९.२०२२ रोजी मागणी केलेली माहिती मोघम स्वरूपाची असून त्यामध्ये अनेक मुद्दे समाविष्ट आहेत. तसेच विशिष्ट स्वरूपाची माहिती नमूद केली नसल्याचे सुचित करीत विशिष्ट स्वरूपाच्या माहिती बाबत लेखी अथवा कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून तसे सुचित केल्यास अर्जावर कार्यवाही करणे शक्य होईल असे नमूद केले आहे. यावर दिनांक ०९.१०.२०२२ रोजी अपिलार्थीनी माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदविलेला आहे. यावर दिनांक १०.११.२०२२ रोजी तत्कालीन अपिलीय

अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, इलाका शहर यांच्याकडे सुनावणी आयोजित करण्यात आली होती. तथापि, अपिलार्थी त्यास हजर राहिले नसल्याचे आढळून येते. त्यानंतर दिनांक १८.११.२०२२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली त्यासही अपिलार्थी गैरहजर होते. त्यानंतर २२.११.२०२२ रोजी व १४.१२.२०२२ रोजी सुनावणी ठेवली होती, त्यातील दिनांक १४.१२.२०२२ रोजीच्या सुनावणीस अपिलार्थी हजर होते. अपिलार्थीनी दाखल केलेल्या जोडपत्राच्या अनुषंगाने तत्कालीन अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी दरम्यान झालेल्या चर्चेनुसार फक्त निधीबाबत विभागातील संबंधित कार्यासनाने अवलोकन करण्याकरीता **कलम ५ (४) व ५ (५)** चा आधार घेत त्वरित तारीख कळवून नि:शुल्क माहिती उपलब्ध करणेबाबत तसेच अर्जातील निधी व्यतिरिक्त इतर मुद्यांबाबत सदर अर्ज सर्व उपविभागीय कार्यालयास **कलम ६ (३)** अंतर्गत वर्ग करण्याची कार्यवाही जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक यांनी करावी असे निर्देशित करीत अपिल अर्ज निकाली काढलेला आहे. त्यानंतर अर्थ लिपिक, विभागीय कार्यालय यांना दिनांक २६.१२.२०२२ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर तारीख कळविण्याविषयी सूचित केले व दिनांक २०.१२.२०२२ रोजी **कलम ६ (३) (२)** अन्वये ६ उपविभागीय अभियंता यांच्याकडे अर्जदारास माहिती उपलब्ध करून देण्यासंदर्भात अर्ज हस्तांतरित देखील केला असल्याचे आढळून येते. तथापि, त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदवीत प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दिनांक २४.०१.२०२३ रोजी दाखल करण्यात आला.

आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हजर नाहीत. वरील आदेशाचे अनुपालन हे या आधीच दिनांक २०.१२.२०२२ व २६.१२.२०२२ रोजी झाले असल्याचे आढळून येते. संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांनी या संदर्भात प्रत्यक्षात कार्यवाही केली किंवा कसे याचा कुठलाही खुलासा हा विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांकडून प्राप्त होऊ शकला नाही कारण **कलम ६ (३) (२)** अन्वये वरील अर्ज हा ६ वेगवेगळ्या जन माहिती अधिकाऱ्यांना हस्तांतरित करण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग हे सार्वजनिक प्राधिकरण असल्याने सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून **कलम ४ (१) (ख) (११)** अन्वये योजना आणि कामांबाबतची सर्व माहिती दर ३ महिन्यांनी अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच दिनांक १५.०७.२०१५ रोजी कोकण खंडपीठाने जारी केलेल्या निर्देशाप्रमाणे अद्ययावत माहिती संकेतस्थळावर प्रत्येक विभाग व उपविभागाकरिता स्वतंत्र **Thread** देऊन त्यामध्ये संबंधित विभागाद्वारे हाती घेण्यात आलेली कामे, सुरू असलेली बांधकाम/ रस्ते/ विविध विकास प्रकल्प यांचा तपशील त्या संदर्भात निविदा प्रक्रिया राबविली असल्यास व ती अंतिम झाली असल्यास त्या संदर्भातील तपशील, मंजूर केलेली रक्कम, उपरोक्त कामास प्रशासकीय मंजुरी मिळाल्याचा तपशील, आर्थिक वर्षनिहाय झालेला खर्च, प्रस्तावित खर्च, शिल्लक रक्कम, प्रदान करण्यात आलेली देयके व प्रलंबित असलेली देयके, संबंधित प्राधिकरणाने झालेल्या विकास कामाचे अवलोकन केल्यानंतर सादर केलेला प्रगती अहवाल, संबंधित कामाच्या दर्जाबाबत

प्राधिकरणाने दिलेले प्रमाणपत्र, काम पूर्ण झाले असल्यास त्यासंदर्भात देण्यात आलेले प्रमाणपत्र, अंतिम देयक प्रदान केल्याबाबतचा तपशील, संबंधित काम हे सदोष आढळल्यास कंत्राटदारावर करण्यात आलेली कार्यवाही (कारणे दाखवा नोटीस), इ.असे सदोष बांधकाम दुरुस्त केल्याबाबत प्राप्त अहवालाची प्रत इत्यादी बाबींचा समावेश असावा.

राज्य सरकार अधिकाअधिक माहिती ही स्वयंप्रेरणेने उघड करण्याबाबत आग्रही असून मा.मुख्यमंत्री महोदयांनी नुकतीच महाराष्ट्र शासनातील सर्व प्रशासकीय व्यवस्था पारदर्शक, तंत्र व नागरिक स्नेही **(Techno friendly and Citizen friendly)** असावी असे वारंवार अधोरेखित केले असून विद्यमान मा.अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यासंदर्भात योग्य ते प्रशासकीय निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व विभाग व उपविभागीय अधिका-यांना प्रचलित पद्धतीनुसार देण्याचे निर्देश या आधीच देण्यात आले आहेत. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

आदेश

अपिल क्र.६६४७/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : १०.०८.२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**